**<u>नियमित दिवाणी कज्ञा क्र.१८३/२०२३ मधील नि.क्र. ७७ वरील आदेश</u>**

( पारीत दिनांक – ०३/०३/२०२५)

श्री. विलास दत्तात्रय जाधव इ.१ वि. श्री. मोहन रंगराव पाटील इ.२

**CNR - MHKO130013152015**

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १ मोहन रंगराव पाटील यांचे नाव नि.१ व नि. ५ मधील टायटल क्लॉज मधून कमी करणेस व तशी दुरुस्ती दावेमध्ये करणेस परवानगी मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** वादीच्या कथनानुसार, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र. १ मोहन रंगराव पाटील हे दि. १६/१०/२०२४ रोजी मयत झाले असून प्रस्तुत दावा निव्वळ मनाईचा असल्याने प्रतिवादी क्र. १ हे मयत झालेनंतर दाव्याचे कामी त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेची आवश्यकता नाही. सबब, प्रतिवादी क्र. १ यांचे नाव करणेस व तशी दुरुस्ती दावेमध्ये करणेस परवानगी मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**३.** सदरील अर्जास प्रतिवादी यांनी अर्जाच्या पुढील बाजूस त्यांचे म्हणणे दाखल केले असून न्यायाच्या कारणास्तव योग्य तो आदेश पारित करण्यात यावे अशी विनंती प्रतिवादीने दि. २२/०१/२०२५ रोजी केली असून अर्जाच्या मागील बाजूस सदरचा अर्ज व अर्जातील मजकूर चुकीचा असल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केल्याचे दिसून येते.

**४.** उभय बाजुच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

**५.** प्रस्तुत प्रकरणी दावा सन २०२३ साली दाखल झाला आहे व दावा हा कायम मनाई करीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणातील प्रतिवादी क्र. १ हे मयत असून त्यांचे नाव नि. १ व नि. ५ मधील टायटल क्लॉज मधून कमी करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने प्रस्तुत अर्जान्वये केलेली आहे असे सदर अर्जाचे अवलोकन करता दिसून येते. वादीने प्रस्तुत अर्जासोबत मयत प्रतिवादी क्र. १ यांचे मृत्यू प्रमाणपत्राची प्रत दाखल केलेली आहे. सदर दाव्यास कारण दि. ०१/०८/२०२३ व ०२/१०/२०२३ रोजी प्रतिवादींनी वादींना हरकत अडथळा केल्यामुळे घडल्याचे दाव्याचे अवलोकन केले असता निदर्शनास येते. प्रस्तुतचा दावा हा फक्त प्रतिवादींविरुध्द कायम मनाई ताकीद होवून मिळणेसाठी दाखल केलेला असल्याने तसेच दाव्याचे कारण फक्त प्रतिवादींविरुध्द निर्माण झाल्याने अर्जातील नमुद कारणांचा विचार करता, सदरचा अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित राहील असे वाटते. सबब, अर्ज मंजूर करणेस पात्र असून खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

## – आ दे श –

१) अर्ज (निशाणी क्र. ७७) वादीनी प्रतिवादी यांना रक्कम रु. २००/– खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी मंजूर अर्जाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती दाव्यामध्ये आज तारखेपासून १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी व त्याप्रमाणे सुधारित प्रत अभिलेखावरती त्वरीत दाखल करावी.

PRANITA SUHAS PATIL Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2025.03.03 17:47:32 +0900

कागल. **(प्रणिता सुहास पाटील)**

दिनांक – ०३/०३/२०२५ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.